**MHNS160008932025**

## <u>आदेश नि.क्रं. ०५ खाली</u>

## दिनांक ०८/०५/२०२६

**(०१)** वादींनी सदरचा दावा सरस निरसमानाने वाटप होउन मिळणेसाठीचा व निरंतरचा ताकिद हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असुन सदरच्या दाव्यात वादींनी प्रतिवादीविरुध्द नि.क्रं. ०५ खाली दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावावर आहे याचा गैरफायदा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी घेउन दाव्याचा विषय असलेले गट क्र. ३११/ड पैकी ०–७० आर क्षेत्राची मिळकत कुणासही खरेदी, विक्री गहाण दान, बक्षिस, मृत्यूपत्र वगैरे तबदिलीच्या लेखाने तबदिल करु नये किंवा दावा मिळकतीवर बोजे निर्माण करु नये या करीता तात्पुरता ताकिद मनाई हुकूमा करीता सदर अर्ज दाखल केला आहे.

**(०२)** वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मिळकतीचे वर्णन – तुकडी जि. प. नाशिक पोट तुकडी तालुका पंचायत समिति चांदवड पैकी मौजे कुंदलगाव या गावचे शिवारातील शेतजमीनीचे वर्णन येणेप्रमाणे

**(अ)** गट क्र. ३११/ड, क्षेत्र हे ५–२६ आर, पो.ख ०–३४ आर, एकुण क्षेत्र हे ५–६० आर, आकार रू. २–२० पैसे. यापैकी क्षेत्र हे ०–७० आर, पो.ख. ०=०६ आर एकुण क्षेत्र हे ०–७६ आर, आकार रू. ०–२९ पैसे. यात एक विहीर व त्यावरील इले. मोटार. यासी चतुःसिमा

**पुर्वेस –** गट क्र. ३२९,

**पश्चिमेस–** गट क्र. ३१०,

**दक्षिणेस–** गट क्र. ३१२, ३१४,

**उत्तरेस–** गट क्र.३३०,३१०.

येणेप्रमाणे मिळकत जलतरू काष्टपाषाण इत्यादी तदंगभूत वस्तुसह दरोबस्त मिळकत. सदर मिळकतीस स्पष्टता येण्याकरीता यापुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते.

(०३) वादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, दावा कलम १ यात वर्णन केलेले गट क्र. ३११/ड या मिळकती पैकी दाव्याचा विषय असलेले ०–७० आर क्षेत्राची मिळकत ही पोपट महादु पवार यांचे मालकीची व कब्जावहीवाटीची अशी होती. पोपट महादु पवार हे सन २०१८ मध्ये मयत असून त्यांचे मृत्युनंतर दाव्यातील गट क्र. ३११/ड मधील ०७० आर क्षेत्रास त्यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावाने तशी वारस नोंद झालेली आहे असे कथन केले आहे.

(०४) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दाव्याचा विषय असलेले गट क्र. ३११/ड पैकी ०–७० आर क्षेत्राचे मिळकती मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा प्रत्येकी सामाईक अविभक्त १/४ हिस्सा आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दाव्याचा विषय असलेल्या मिळकती एकत्रात वहीती करून उत्पन्न घेतात असे कथन केले आहे. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांचा विवाह दिनांक ६/७/२००७ रोजी मौजे रायपुर, ता. चांदवड येथे झालेला असून सदरचे विवाह संबंधातुन प्रतिवादी क्र. १ पासून वादी क्र. १ हीस अज्ञान वादी क्र. २ ही मुलगी झालेली आहे व वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांचे पतीपत्नीचे नातेसंबंध आजपावेतो कायम आहे. वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांचा विवाह झाल्यानंतर वादी क्र. १ ही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे एकत्र कुटूंबात मौजे वादवराडी ता. चांदवड येथे नांदणेस गेली. सुरूवातीस वादी क्र. १ हीस प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी बरे वागविले व त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ ही प्रतिवादी क्र. १ चे कान भरवु लागली व त्यांचे ऐकुन वादी क्र. १ हीस त्रास देऊ लागली व वादी क्र. १ हीस प्रतिवादी क्र. १ हा मारहाण करू लागला व तुझे आईवडीलांनी लग्न चांगले करून दिले नाही असे म्हणून वादी क्र. १ हीचा शारिरीक, मानसिक छळ करू लागले व त्यानंतर वादी क्र. १ हीस प्रतिवादी क्र. १ पासून वादी क्र. २ ही मुलगी झाली त्यावेळी प्रतिवादी क्र. १ व ३ हे वादी क्र. १ हीस म्हणु लागले की, तुला मुलगीच झाली, मुलगा झाला नाही, आम्हाला मुलगा हवा होता, तुला

मुलगा होणार नाही, तरी तु फारकत देऊन टाक असे म्हणु लागले व वादी क्र. १ हीचा शारिरीक व मानसिक छळ करू लागले व प्रतिवादी क्र. १ व ३ वादी क्र. १, २ यांचेकडे कोणतेही लक्ष देत नसत वादी हे आजारी पडल्यानंतर दवाखान्यात देखील औषधोपचार करीत नसत तसेच वादी क्र. १ हीचे चारित्र्यावर प्रतिवादी क्र. १ हा संशय घेऊ लागला व प्रतिवादी क्र. १ यास दारूचे व्यसन लागले व दारूच्या नशेत नेहमी वादी क्र. १, २ यांना मारहाण करीत असत व वादी क्र. १ ही प्रतिवादी क्र. १ बरोबर संसार करीत असताना दिनांक १०/१०/२०२४ रोजी वादी क्र. १ हीने माहेरून रक्कम रूपये १० लाख घेऊन ये तरच तुला नांदवु नाही तर फारकत देऊन टाक, त्यावेळी वादी क्र. १ हीने माहेरून पैसे आणण्यास नकार दिला व माझे आईवडीलांची परिस्थिती गरीबीची आहे असे समजावुन सांगितले असता प्रतिवादी क्र. १, ३ यांनी वादी क्र. १ हीस मारहाण करून अंगावरील मनीमंगळसुत्राची पोत व कानातील झुबे, पायाची तोरड्या काढुन घेतल्या व वादी यांना माहेरी हुसकावुन दिले त्यानंतरही वादी क्र. १ हीने प्रतिवादी क्र. १ यांचेकडे वादी क्र. २ सह नांदणेचा प्रयत्न केला परंतु प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी वादी हीस घरात घेतले नाही व वादी क्र. १ हीस शिवीगाळ व दमदाटी करून मारून टाकण्याच्या धमक्या देऊ लागलो म्हणून वादी क्र. १ हीने दिनांक ९/१/२०२५ रोजी महिला हक्क संरक्षण समिती आडगाव नाशिक यांचेकडे तशी लेखी तक्रार केली व त्यानंतर वादी क्र. १, २ यांनी प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे विरूध्द कौटूंबिक हिंसाचारापासून २००५ चे कलम १८, १९, २०, २१, २२ प्रमाणे मे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साो. वर्ग १ यांचे कोर्टात अर्ज दाखल केला व सदरचे अर्जाचे कामकाज मे. कोर्टात न्यायप्रविष्ठ आहे असे कथन केले आहे.

**(०५)** वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र. १, २ यांनी प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे विरूध्द महिला हक्क संरक्षण समितीकडे अर्ज दाखल केला व त्यानंतर कौटूंबिक हिंसाचाराचा अर्ज फौजदारी कोर्टात दाखल केला त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ हे चिडून गेले व वादी क्र. १ हीस म्हणु लागले की, कोर्टात केलेल्या केसेस मागे घेऊन टाक, नाही तर जमिनी आमचे

नावावर आहे आम्ही जमिनी विक्री करून टाकु, तुम्हाला कपाळा लावायला देखील माती ठेवणार नाही अशी भाषा प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी माहे एप्रिल २०२५ मध्ये केली म्हणून दाव्याचा विषय असलेल्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ याचा सामाईक अविभक्त १/४ हिस्सा आहे, प्रतिवादी क्र. १ चे सामाईक अविभक्त १/४ हिश्यात वादी यांचा असलेला २/३ हिस्सा प्रतिवादी क्र. १ कडून अलग व तुटक करून त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी व दाव्याचा विषय असलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावावर आहे याचा गैरफायदा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी घेऊन दाव्याचा विषय असलेले गट क्र. ३११/ड पैकी ०–७० आर क्षेत्राची मिळकत कुणासह खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षिस, मृत्युपत्र वगैरे तबदिलीच्या लेखाने तबदिली करू नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करू नये अशी तात्पूरता ताकीद देवविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे व तो मंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

(०६) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वादींना चांगली केस असून न्यायाचे समतोलत्व वादीचे लाभात असून ते प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे लाभात नाही तरी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीत त्यांचे असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीस कुणासह खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षिस, मृत्युपत्र वगैरे तबदिलीच्या लेखाने तबदिली करू नये अशी तात्पूरती ताकीद देवविण्यासाठी व दावा मिळकतीवर कर्जाचे बोजे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे निर्माण करतील त्यामुळे वादीचे कधीही न भरून येईल असे अपरिमित असे नुकसान होईल वादीस त्यांचे न्याय हक्कापासून व मालकी हक्कापासून वंचित व्हावे लागेल. याउलट प्रतिवादी यांचे विरूध्द तात्पूरता ताकीद हुकूम देवविल्यास प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही असे कथन केले आहे.

(०७) प्रतिवादी क्र १ या प्रकरणात हजर झाला व त्याने नि. क्रं. १९ वर

त्याचा लेखी जबाब दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांच्या लेखी जबाबात असे कथन केले आहे की, वादीचा प्रस्तुतचा दावा व दाव्यातील संपूर्ण मजकूर हा खोटा, लबाडीचा आणि बेकायदेशीर असून, प्रतिवादींनी स्पष्टपणे मान्य न केलेली वादीची सर्व विधाने शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर आहे. वादीने दाव्यात नमूद केलेले मिळकतीचे वर्णन आणि वंशवृक्ष चुकीचा असून, सदर मिळकतीविरुद्ध दावा दाखल करण्याचा वादीस कोणताही कायदेशीर हक्क किंवा संयुक्तिक कारण नाही. तसेच, मूळ मालक पोपट महादू पवार यांच्या पश्चात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या कुटुंबाची जी शेतजमीन होती, त्यापैकी प्रतिवादी क्र. १ यांच्या वाटणीचा हिस्सा त्यांनी यापूर्वीच कायदेशीर कारणासाठी त्रयस्थ इसमास विक्री केलेला आहे; त्यामुळे दाव्यातील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचा कोणताही हिस्सा शिल्लक राहिलेला नसताना वादीने हा दावा विनाकारण दाखल केला असल्याने तो फेटाळण्यात यावा असे कथन केले आहे.

(०८) प्रतिवादींनी त्यांच्या लेखी जबाबात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ यांचा दावा मिळकती मध्ये कोणताही हिस्सा शिलक राहिलेला नाही व याबाबत वादी क्र. १ व २ यांस संपूर्ण कल्पना असताना केवळ प्रतिवादी क्र. १ ते ४ यांस त्रास देण्यासाठी व प्रतिवादी क्र. १ व इतर प्रतिवादी यांचेत देखील वाद निर्माण व्हावे या दुष्ट हेतूने वादी यांनी सदरचा खोटा दावा लबाडीने दाखल केलेला आहे असे कथन केले आहे. वादी यांस कोणताही कायदेशीर अधिकार नसताना वादी यांनी दावा दाखल करून चुकीच्या व बेकायदेशीर मागण्या नमूद केलेल्या आहे आणि सदरचा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे असे कथन केले आहे.

(०९) वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्रं. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींनी आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima-facie case ) सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादींचे बाजुने आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादींनी सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ४ | कोणता आदेश ? | अंतिम ओदशानुसार. |

## कारणमिमांसा

**विचाराधीन प्रश्न क्रं. १ ते ३ करीताः-**

(१०) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले.

(११) वादीचे असे कथन आहे की, दावा गट क्र. ३११/ड या मिळकती पैकी दाव्याचा विषय असलेले ०-७० आर क्षेत्राची मिळकत ही पोपट महादु पवार यांचे मालकीची व कब्जावहीवाटीची होती व पोपट महादु पवार हे सन २०१८ मध्ये मयत असून त्यांचे मृत्युनंतर दाव्यातील गट क्र. ३११/ड मधील ०७० आर क्षेत्रास त्यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावाने नोंद झालेली आहे.

(१२) वादीचे असे कथन आहे की, वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांचा विवाह दिनांक ६/७/२००७ रोजी झालेला असून सदरचे विवाह संबंधातुन प्रतिवादी क्र. १ पासून वादी क्र. १ हीस अज्ञान वादी क्र. २ ही मुलगी झालेली आहे व दाव्याचा विषय असलेल्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ याचा सामाईक

अविभक्त १/४ हिस्सा आहे, प्रतिवादी क्र. १ चे सामाईक अविभक्त १/४ हिश्यात वादी यांचा असलेला २/३ हिस्सा प्रतिवादी क्र. १ कडून अलग व तुटक करून त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी व दाव्याचा विषय असलेले गट क्र. ३११/ड पैकी ०–७० आर क्षेत्राची मिळकत कुणासह खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षिस, मृत्युपत्र वगैरे तबदिलीच्या लेखाने तबदिली करू नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करू नये अशी तात्पूरता ताकीद देवविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे व तो मंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

(१३) प्रतिवादीचे असे कथन आहे की, वाद मिळकतीविरुद्ध दावा दाखल करण्याचा वादीस कोणताही कायदेशीर हक्क किंवा संयुक्तिक कारण नाही. तसेच, मूळ मालक पोपट महादू पवार यांच्या पश्चात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या कुटुंबाची जी शेतजमीन होती, त्यापैकी प्रतिवादी क्र. १ यांच्या वाटणीचा हिस्सा त्यांनी यापूर्वीच कायदेशीर कारणासाठी त्रयस्थ इसमास विक्री केलेला आहे. त्यामुळे वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचा कोणताही हिस्सा शिल्लक राहिलेला नसताना वादीने हा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज विनाकारण दाखल केला असल्याने व वादींना या प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकिद मागण्याचा कायदयाने अधिकार नाही त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे असे कथन केले आहे.

(१४) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीच्या व प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, पोपट पवार हे मयत झाले व त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना वाद मिळकत हिस्सेवाटनीत मिळाली आहे. प्रतिवादी क्र. १ हे वादीचे पती व वादी क्र. २ चे वडील असल्याने वादीचा प्रतिवादी क्र. १ ला मिळालेल्या मिळकतीत हीस्सा आहे व तो मिळण्याकरीता वादीने हा दावा व मनाई हुकुमाकरीता सदर अर्ज दाखल केला आहे.

(१५) वादीने दावा हा हिस्सेवाटनीकरीता तिचे पती विरूदध दाखल केला आहे. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत एकत्र कुंठुंबाची मिळकत आहे किवा कसे व वादीचा वाद मिळकतीत तिचे पतीचे हयातीत/ पती जिवंत असतांना तिचे पतीला त्याचे वडीलांकडुन मिळालेल्या मिळकतीत हीस्सा आहे किवा कसे ही या दाव्यात

वादांकीत बाब आहे. वाद मिळकतीच्या हिस्से वाटण्या झाल्या आहेत असे वादीचे कथन आहे, मिळकतीच्या हिस्सेवाटण्या झाल्यानेतर मिळकत ही सदर व्यक्तीची स्वतंत्र मिळकत म्हनुण गणल्या जाते. मात्र वादीने तिचे पतीच्या व मिळकतीच्या ईतर सह धारकांना या दाव्यात पक्षकार केले आहे व त्यांचे विरुदध सुदधा मनाई हुकुम मागीतला आहे. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आलेली नाही. वादीने दावा हा मिळकतीचे सहधारका विरूदध दाखल केला असल्याने व या दाव्यातील वादीने कथन केलेली परीस्थीती लक्षात घेता प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या बाजूने झुकताना दिसतो. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला तर प्रतिवादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी हे तुर्तातुर्त मनाई हूकूम मिळण्यास पात्र ठरत नाही.

**(१६)** वरील विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या बाजूने झुकताना दिसतो. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला तर प्रतिवादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. म्हणुन वरील सर्व बाबींचा विचार करता मी प्रश्न क्रं. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून विचाराधीन प्रश्न क्रं. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्रं. ०५ नामंजुर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत दाव्याचे अंतिम निकालाचे वेळी विचार करण्यात यावा. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.05.08 18:06:07 +0530

ठिकाण : चांदवड.
दिनांक : ०८/०५/२०२६.

**(एस. एस. छल्लाणी)**
दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चांदवड.

दि. दा. क्र . १४७/२०२५
सोनाली + १ वि. शरद + ३

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,*** लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्रं.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०८/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०८/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०८/०५/२०२६ |